नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १८८ | Issue - 188 | वार सोमवार दि. २५ नोव्हेंबर २०२४ | Blow- Monday Date 25 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### मनसेची मान्यता रद्द होणार?

मुंबई : यंदाच्या विधानसभा निवडणुकांनंतर महाराष्ट्रात राजकीय सत्तासमीकरणं वेगळ्या पद्धतीने बदलू लागली आहेत. सर्वच अंदाज फोल ठरवत महायुतीनं जोरदार मुसंडी मारली आहे. महाराष्ट्रात महायुतीला २३५ जागा मिळाल्या असून एकट्या भाजपाला १३२ जागांवर विजय मिळाला आहे. त्यामुळे महायुतीचं सरकार येणार हे स्पष्ट झालं असून महाविकास आघाडीची अवघ्या ४९ जागांवर मोठी पीछेहाट झाली आहे. या पार्श्वभूमीवर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या भवितव्याबाबत मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. मनसेची मान्यताच रद्द होण्याची शक्यता असून त्यासंदर्भातल्या निकषांवर विधिमंडळाचे माजी प्रधान सचिव अनंत कळसेंनी भाष्य केलं आहे. अनंत कळसेंनी एबीपीशी बोलताना पक्षमान्यतेच्या निकषांची माहिती दिली आहे. तसेच, या निकषांमध्ये मनसे पक्षाची विधानसभा निवडणुकीतली कामगिरी बसत नसल्याचं सांगत त्यांना आयोग नोटीस पाठवू शकतो, असंही ते म्हणाले आहेत.

# महाराष्ट्राच्या जनतेपुढे मी नतमस्तक

## देवेंद्र फडणवीसांकडून कृतज्ञता व्यक्त ; मतदार, कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांचे मानले आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खालल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेसाठी कंबर कसली होती. लोकसभेच्या पराभवानंतर देवेंद्र फडणवीसांनी जबाबदारीतून मुक्तीसाठी मागणी केली होती. परंतु, पक्षश्रेष्ठींनी ही मागणी मान्य न करता विधानसभेसाठी पुन्हा त्यांनाच संधी दिली. त्यांनी या संधीचं सोनं केलं असून भाजपासह महायुतीतील सर्वच घटकपक्षांच्या जास्त मताधिक्याने जागा आणल्या आहेत. दरम्यान, देवेंद्र फडणवीसांनी आता मतदार, कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. त्यांनी यासंदर्भात आज एक्सवर पोस्ट केली.




महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत महायुतीला मिळालेला महाविजय फक्त भाजपा-महायुतीचा नाही, तर महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या विश्वासाचा आहे. तुम्ही दाखवलेल्या या विश्वासासाठी आणि दिलेल्या प्रेमाबद्दल महाराष्ट्राच्या जनतेपुढे मी नतमस्तक होतो, असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

मेहनत, एकजूटता, लाडक्या बहिणींचे आशीर्वाद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर महाराष्ट्राच्या तमाम जनतेने दाखविलेला विश्वास या विजयाचे खरे शिल्पकार आहेत. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी, मित्रमंडळी आणि माझा प्रत्येक समर्पित कार्यकर्ता ज्यांनी गेले काही दिवस जिवाचे रान करून वेळ-काळ न पाहता मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला, अशा सर्वांचा मी कायम ऋणी राहीन!, असं फडणवीस म्हणाले.

आपणा सर्वांच्या पाठिंब्यामुळेच महायुतीला मिळालेल्या या विजयाने एक नवीन दिशा दिली आहे. हे यश आपल्या महाराष्ट्राला एक प्रगतीशील आणि सर्वसमावेशक भवितव्यासोबत मोदींच्या नेतृत्वात विकसित भारतासह विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रेरणा देत राहील. पुन्हा एकदा आपले मनःपूर्वक आभार. आपला विश्वास आणि प्रेम सदैव राहो. हीच ईश्वरचरणी प्रार्थना, असं म्हणत त्यांनी सर्वांचे आभार मानले.

लोकसभेनंतर लगेचच विधानसभेच्या निवडणुका झाल्या असत्या तर त्याचा फटका महायुतीला बसण्याची शक्यता होती. त्यामुळे फडणवीस यांनी पराभवाच्या कारणांचा शोध घेत त्यावर उपाययोजना सुरू केल्या. शिवाय कार्यकर्त्यांचे मनोबल खचू नये म्हणून त्यांच्यात पुढची निवडणूक आपणच जिंकणार असा विश्वास निर्माण केला. प्रचारासाठी बुथनिहाय नियोजन करण्यात आले. उमेदवारी वाटप करताना सर्व समाजघटकांचा विचार करण्यात आला. 'लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणीचा लाभ निवडणुकीत व्हावा हे चाणाक्षपणे पाहण्यात आले. या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणून भाजपसह महायुतीतील घटक पक्षांनाही मिळाले.

# राज्यात जातीय विभाजनाचा प्रयत्न कधीही घडला नव्हता; पृथ्वीराज चव्हाण यांची खंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कराड : भाजपच्या नेत्यांकडून मराठा विरुद्ध इतर मागासवर्गीय (ओबीसी), आदिवासी विरुद्ध धनगर, हिंदू दलित विरुद्ध बुद्धिस्ट दलित असे विभाजन करण्याचा प्रयत्न झाला. हे राज्याच्या भविष्याकरिता धोकादायक असून, महाराष्ट्रात असे कधीही घडले नव्हते, अशी खंत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केली. महाविकास आघाडीने जाती-पातीचे राजकारण बिलकुल केले नसल्याचा निर्वाळा त्यांनी दिला.

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात 'मविआ'तर्फे काँग्रेसचे उमेदवार म्हणून पराभव झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. कराड दक्षिणच्या मतदारांनी दिलेला कौल मान्य असल्याचे स्पष्ट करीत विजयी झालेल्या भाजप उमेदवार डॉ. अतुल भोसले तसेच राज्यातील नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांचे पृथ्वीराज चव्हाण यांनी अभिनंदन केले. 'कराड दक्षिण'मध्ये विजयी झालेल्या प्रतिस्पर्धी उमेदवाराकडून मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सुटावेत. त्यासाठी आपले निश्चित सहकार्य राहणार असल्याची ग्वाही चव्हाण यांनी दिली. माझ्यावर मतदार नाराज का झाले? मी कुठे कमी पडलो? याचे विश्लेषण मला करावे लागणार आहे. मी पदावर नसलो तरी कराडकरांची सेवा करत राहणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. आपल्यासाठी झटलेल्या सर्व कार्यकर्ते, मतदारांचे त्यांनी आभारही मानले. राज्यातील सर्व सहकाऱ्यांशी बोलणार असून, निवडणुकीबद्दल निश्चितपणे बरेचशे तर्कवितर्क आहेत. त्यामुळे आताच एकदम भाष्य करणे योग्य नाही. काही



लोकांचे म्हणणे आहे की निवांत झालो की बोलूया.हरियाणाचा निकाल थोडासा नकारात्मक गेला हे खरे आहे. त्याची चिंता आम्ही करत आहोत. महाविकास आघाडीने राज्यभर ठरवून काही जातीपातीचे राजकारण केले हे बिलकुल खरे नाही. मराठा आंदोलनाचा आणि महाविकास आघाडीचा थेट काही संबंध नाही. विरोधकांनी काही भूमिका घेतली. पण, त्याचा फार प्रभाव पडला नसल्याचे मत चव्हाणांनी व्यक्त केले.

विधानसभेच्या २०१९ मधील निवडणुकीच्या तुलनेमध्ये याखेपेस खूप चांगला पाठिंबा मिळेल असे आपल्याला वाटले. पण, मतदारांनी एकदम राज्यभर असा धक्कादायक निर्णय का घेतला हा प्रश्न आहे. सगळे निकाल एकसारखे दिसत आहेत. सगळ्या जागा आमच्याच पडल्या आहेत. आम्ही महाविकास आघाडी म्हणून काम करायला कमी पडलो का? हे पाहणार असल्याचे चव्हाण म्हणाले.

आपणाला केंद्रात आणि राज्यात काम करायची संधी मिळाली. हे सगळे आपल्या मतदारांच्या आशीर्वादामुळे शक्य झाले. पण, मतदार का नाराज झाले, मी कुठे कमी पडलो याचे विश्लेषण मला करावे लागणार आहे. मी कोणत्याही पदावर असलो नसलो तरी कराडकरांची सेवा करत राहणार असल्याचे पृथ्वीराज चव्हाण यांनी या वेळी सांगितले.

# १५ वी विधानसभा अस्तित्वात; नवनिर्वाचित सदस्यांची यादी राज्यपालांकडे सूपूर्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मवळत्या विधानसभेची मुदत मंगळवारी संपुष्टात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर मतमोजणी पार पडताच लगेचच दुसऱ्या दिवशी निवडणूक आयोगाने निकालाची अधिसूचना आणि निवडून आलेल्या २८८ सदस्यांची नावांची यादी व राजपत्राची प्रत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना रविवारी सायंकाळी सादर केली. ही प्रक्रिया पार पडल्याने १५वी विधानसभा आता अस्तित्वात आली आहे.




निवडणूक आयोगाचे उप मुख्य निवडणूक आयुक्त हिरदेश कुमार व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भेट घेऊन त्यांना राज्य विधानसभा निवडणुकीच्या जाहीर झालेल्या निकालाची अधिसूचना - निवडून आलेल्या सदस्यांची यादी - व राजपत्राची प्रत सादर केली. यावेळी राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, निवडणूक आयोगाचे सचिव सुमन कुमार दास व कक्ष अधिकारी निरंजन कुमार शर्मा हेदेखील उपस्थित होते.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७३ मधील तरतूदीनुसार, या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांची नावे, भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक २४ नोव्हेंबर, २०२४ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहेत. १५वी विधानसभा अस्तित्वात आल्याने आता कायदेशीर पेच कोणताही येणार नाही. नवीन विधानसभेच्या पहिल्या बैठकीपासून पुढील पाच वर्षे विधानसभेची मुदत ग्राह्य धरली जाते.

राज्यात नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर आता नव्या सरकारच्या प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. त्यानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यपालांकडे आपला राजीनामा सूपूर्द करावा लागेल. त्यानंतर राज्यपाल मुख्यमंत्र्यांना पुढील सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची सूचना करतील. महायुतीचा विधिमंडळ पक्षाच्या नेता निवडीनंतर सरकार स्थापण्याचा दावा केला जाईल. त्यानंतरच शपथविधी समारंभ पार पडेल.

**बटेंगे तो कटेंगे या नाऱ्यामुळे मतांचे ध्रुवीकरण**

**शरद पवारांनी घेतली पत्रकार परिषद**

# मी घरी बसणार नाही; नव्या जोमाने कर्तृत्वान पिढी उभी करणं हा माझा कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : शरद पवारांनी आतापर्यंत आयुष्यात अनेक राजकीय वादळे झेलली आहेत. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक चढउतार आले. पण प्रत्येकवेळी त्यांनी त्यावर मात केली आहे. या अनेक अनुभवांविषयी शरद पवार त्यांच्या अनेकविध भाषणांतही सांगत असतात. त्यामुळे आता वयाच्या ८४ व्या वर्षी आलेल्या अपयशामुळे शरद पवार पुढे काय भूमिका घेतात याकडे सगळ्या राज्याचं लक्ष आहे. यावर ते म्हणाले, निकाल काल लागला. आज मी कराडमध्ये आहे. हा निकाल लागल्यानंतर एखादा घरी बसला असता. पण मी काही घरी बसणार नाही. आमच्या तरुण पिढीला हा निकाल लागेल असं वाटलं नव्हतं. त्यांचा आत्मविश्वास वाढला पाहिजे. त्यांना पुन्हा उभं करणं, त्यांचा आत्मविश्वास वाढवणं, नव्या जोमाने कर्तृत्वान पिढी उभी करणं हा माझा कार्यक्रम राहील', असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

विधानसभेचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला. या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं. मात्र, महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. खरं तर ही विधानसभेची निवडणूक महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी अटीतटीची होईल असं बोललं जात होतं. पण महायुतीने मोठं घवघवीत यश मिळवलं. दुसरीकडे महाविकास आघाडीला फारसं यश मिळवता आलं नाही, उलट आघाडीतील अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरं जावं लागलं. या निकालानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून प्रतिक्रिया देण्यात येत आहेत.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रतिक्रिया देत महायुतीच्या विजयावर



संशय व्यक्त केला होता.

यानंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत भाष्य केलं. तसेच आमची जशी अपेक्षा होती तसा हा निकाल लागलेला नाही. मात्र, शेवटी लोकांनी दिलेला निर्णय आहे. लोकांनी दिलेल्या निर्णयाचा मी अभ्यास करणार आहे. तसेच या निवडणुकीत बटेंगे तो कटेंगे या नाऱ्यामुळे मतांचे ध्रुवीकरण झाल्याचा आरोप शरद पवार यांनी केला. तसेच लाडकी बहीण योजनेबाबत महायुतीकडून अपप्रचार करण्यात आल्यामुळे त्याचाही काही फटका आम्हाला बसल्याची कारणं शरद पवारांनी सांगितली आहेत.

आमची जशी अपेक्षा होती तसा हा निकाल नाही. मात्र, शेवटी लोकांनी दिलेला निर्णय आहे. सध्या माझ्याकडे अधिकृत काही माहिती नाही. त्यामुळे निकालाबाबत काही भाष्य करणं योग्य नाही. निर्णय लोकांनी दिला आहे.

अनेक वर्ष आम्ही सामाजिक जीवनात आहोत. असा अनुभव आम्हाला कधी आला नव्हता. आता असा अनुभव आला आहे तर त्याचा अभ्यास करणं, त्याची कारणं समजून घेणं आणि पुन्हा एकदा नव्या उत्साहाने लोकांमध्ये जाऊन काम करणं गरजेचं आहे, असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

सत्ताधाऱ्यांकडून निवृत्त होण्याच्या टीकेला प्रत्युत्तर देताना शरद पवार म्हणाले की, मी काय करावं? ते मी आणि माझे सहकारी ठरवतील. त्यामुळे तो महत्वाचा प्रश्न नाही. आता निकालानंतर जी माहिती आम्ही लोकांकडून आणि आमच्या कार्यकर्त्यांकडून घेतो आहोत त्यामध्ये लाडकी बहीण योजनेचा अपप्रचार करण्यात आला की ते सत्तेत आले नाहीत तर ही योजना बंद होईल, त्यामुळे मोठ्या प्रमाणात काही वर्गाने आमच्या विरोधात जाऊन मतदान केलं, असं कारण शरद पवारांनी सांगितलं.

लोकसभेच्या निवडणुकीत ज्या प्रकारची राज्यातील जनतेची भावना होती. त्यामुळे आम्हाला थोड्याफार प्रमाणात विश्वास होता. त्या विश्वासामुळे आम्ही ज्या प्रकारे प्रचार केला. मात्र, त्याही पेक्षा जास्त प्रचार करण्याची गरज होती असं आता वाटतं, असं महत्वाचं विधान शरद पवार यांनी केलं. तसेच आमच्या काही सहकाऱ्यांनी ईव्हीएमवर शंका घेतली. मात्र, याबाबत जोपर्यंत अधिकृत माहिती हातात येत नाही तोपर्यंत मी याबाबत काहीही भाष्य करणार नाही, असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

विधानसभेच्या निवडणुकीत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे असा नारा दिला होता. मात्र, याचा फटका महाविकास आघाडीला बसला का? असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला असता त्यांनी बटेंगे तो कटेंगेमुळे आम्हाला फटका बसल्याची कबुली दिली. ते म्हणाले, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे हा नारा दिला. मात्र, त्या नाऱ्यामुळे निवडणुकीत मतांचं ध्रुवीकरणं नक्कीच झालं. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री महाराष्ट्रात येऊन ज्याप्रकारे प्रचार करत होते, त्याचा निश्चितच फरक पडला, असंही शरद पवारांनी म्हटलं आहे. दरम्यान, लाडकी बहीण योजनेचा सत्ताधाऱ्यांकडून अपप्रचार, प्रचाराला धार्मिक रंग देण्याचा महायुतीकडून प्रयत्न, ओबीसीचं मतदान, अशी काही कारणांचा महाविकास आघाडीला फटका बसल्याची कारणं शरद पवारांनी सांगितली आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### कृतज्ञता...

लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खालल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेसाठी कंबर कसली होती. लोकसभेच्या पराभवानंतर देवेंद्र फडणवीसांनी जबाबदारीतून मुक्तीसाठी मागणी केली होती. परंतु, पक्षश्रेष्ठींनी ही मागणी मान्य न करता विधानसभेसाठी पुन्हा त्यांनाच संधी दिली. त्यांनी या संधीचं सोनं केलं असून भाजपासह महायुतीतील सर्वच घटकपक्षांच्या जास्त मताधिक्याने जागा आणल्या आहेत. दरम्यान, देवेंद्र फडणवीसांनी आता मतदार, कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत महायुतीला मिळा-लेला महाविजय फक्त भाजपा-महायुतीचा नाही, तर म हाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या विश्वासाचा आहे. तुम्ही दाखवलेल्या या विश्वासासाठी आणि दिलेल्या प्रेमाबद्दल म हाराष्ट्राच्या जनतेपुढे मी नतमस्तक होतो, असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. मेहनत, एकजूटता, लाडक्या बहिणींचे आशीर्वाद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर महाराष्ट्राच्या तमाम जनतेने दाखविलेला विश्वास या विजयाचे खरे शिल्पकार आहेत. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी, मित्रमंडळी आणि माझा प्रत्येक समर्पित कार्यकर्ता ज्यांनी गेले काही दिवस जिवाचे रान करून वेळ-काळ न पाहता मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला, अशा सर्वांचा मी कायम ऋणी राहीन! लोकसभेनंतर लगेचच विधानसभेच्या निवडणुका झाल्या असत्या तर त्याचा फटका महायुतीला बसण्याची शक्यता होती. त्यामुळे फडणवीस यांनी पराभवाच्या कारणांचा शोध घेत त्यावर उपाययोजना सुरू केल्या. शिवाय कार्यकर्त्यांचे मनोबल खचू नये म्हणून त्यांच्यात पुढची निवडणूक आपणच जिंकणार असा विश्वास निर्माण केला. प्रचारासाठी बुथनिहाय नियोजन करण्यात आले. उमेदवारी वाटप करताना सर्व समाजघटकांचा विचार करण्यात आला. 'लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणीचा लाभ निवडणुकीत व्हावा हे चाणाक्षपणे पाहण्यात आले. या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणून भाजपसह महायुतीतील घटक पक्षांनाही मिळाले.

## नवे सरकार स्थापन झाले की सामूहिक उपोषणाची तारीख; मनोज जरांगे यांचे प्रतिपादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : मराठा समाजास ओबीसीमधून आरक्षण मिळाले पाहिजे, या मागणीचा आंदोलक मनोज जरांगे यांनी पुनरुच्चार केला आणि राज्यात नवीन सरकार स्थ-ापन झाले की सामूहिक उपोषणाची तारीख जाहीर करण्यात येईल, असे रविवारी सांगितले. आंतरवाली सराटी येथे म ाध्यम प्रतिनिधींशी बोलताना जरांगे म्हणाले, सरकार कुणाचेही येवो, आम्हाला आंदोलन करावे लागेल हे आपण आधीच सांगितले होते.



विधानसभा निवडणुकीत जरांगे प्रभाव अयशस्वी ठरला, अशी टीका करणारांना मराठ्यांचा प्रभाव कळण्यासाठी संपूर्ण हयात जाईल. आपण मराठ्यांच्या म तांवर विजयी झालो नाही, असे निवडून आलेल्या एखाद्या आम दारास बोलून दाखवण्यास सांगा. आम्ही उमेदवाराच उभे केले नव्हते. तरीही आमचा प्रभाव अयशस्वी झाला असे का म्हण-ता? मराठा मतांशिवाय कुणीही सत्तेवर येऊ शकत नाही. मराठा प्रभाव अयशस्वी झाल्याचे विश्-लेषण काय करता? महिनाभर थांबा, तुम्हाला आमची ताकद कळेल. मराठा समाज सर्व पक्षांत विखुरलेला असला तरी तो आरक्षणाच्या आंदोलनात एकत्र दिसेल. निवडून येणारे आणि पराभूत होणारे दोघांनीही मराठ्यांच्या मदतीला गेले पाहिजे, असे जरांगे म्हणाले.

# महाराष्ट्राचे हे आहे २८८ नवे आमदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१) अक्कलकुवा- आमश्या पाडवी (शिवसेना) २) शहादा-राजेश पाडवी (भाजपा) ३) नंदुरबार-विजयकुमार गा-वीत (भाजपा) ४) नवापुर-शिरीषकुमार नाईक (काँग्रेस) ५) साक्री-मंजुळा गा-वीत (शिवसेना) ६) धुळे ग्रामीण-राघवेंद्र पाटील(भाजपा) ७) धुळे शहर-अनुप अग्रवाल (भाजपा) ८) सिंदखेडा-जयकुम ार रावल (भाजपा) ९) शिरपूर-काशीराम पावरा (भाजपा) १०) चोपडा-चंद्रकांत सोनावणे (शिवसेना) ११) रावेर-अमोल जावळे (भाजपा) १२) भुसावळ-संजय सावकारे (भाजपा) १३) जळगाव शहर-सुरेश भोळे (भाजपा) १४) जळगाव ग्राम ीण-गुलाबराव पाटील (शिवसेना) १५) अमळनेर-अनिल पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) १६) एरंडोल-अमोल पाटील (शिवसेना) १७) चाळीसगाव- मंगेश चव्हाण (भाजपा) १८) पाचोरा-किशोर पाटील (शिवसेना) १९) जामनेर-गिरीश महाजन (भाजपा) २०) मुक्ताईनगर-चंद्रकांत पाटील (शिवसेना) २१) म लकापुर-चैनसुख संचेती (भाजपा) २२) बुलढाणा-संजय गायकवाड (शिवसेना) २३) चिखली-श्वेता महाले (भाजपा) २४) सिंदखेडराजा-मनोज कायंदे (राष्ट्रवादी काँग्रेस) २५) मेहकर-सिद्धार्थ खरात (शिवसेना - यूबीटी) २६ खाम गाव-आकाश फुंडकर (भाजपा) २७ जळगाव (जामोद)-संजय कुटे (भाजपा) २८ अकोट-प्रकाश भारसाकळे (भाजपा) २९ बाळापूर-नितीन देशमुख (शिवसेना-यूबीटी) ३० अकोला पश्चिम-साजिद खान पठाण (काँग्रेस) ३१ अकोला पूर्व-रणधीर सावरकर (भाजपा) ३२ मूर्तिझापूर-हरिश पिंपळे (भाजपा) ३३ रिसोड-अमित झनक (काँग्रेस) ३४ वाशिम-श्याम खोडे (भाजपा) ३५ कारंजा-सई डहाके (भाजपा) ३६ धामणगाव रेल्वे-प्रताप अडसड (भाजपा) ३७ बडनेरा-रवी राणा (महायुती) ३८ अमरावती-सुलभा खोडके (राष्ट्रवादी काँग्रेस) ३९ तिवसा-राजेश वानखेडे (भाजपा) ४० दर्यापूर-गजानन लवटे (शिवसेना - यूबीटी) ४१ मेळघाट-केवलराम काळे (भाजपा) ४२ अचल-पूर-प्रवीण तायडे (भाजपा) ४३ म ोर्शी-उमेश यावलकर (भाजपा) ४४ आर्वी-सुमित वानखेडे (भाजपा) ४५ देवळी-राजेश बकाने (भाजपा) ४६ हिंघणघाट-समीर कुणावार (भाजपा) ४७ वर्धा- पंकज भोयर (भाजपा) ४८ काटोल-चरनसिंग ठाकूर (भाजपा) ४९ सावनेर-आशीष देशमुख (भाजपा) ५० हिंगणा-समीर मेघे (भाजपा) ५१ उमरेड-संजय मेश्राम (काँग्रेस) ५२ नागपूर दक्षिण पश्चिम- देवेंद्र फडणवीस (भाजपा) ५३ नागपूर दक्षिण-मोहन मते (भाजपा) ५४ नागपूर पूर्व- कृष्णा खोपडे (भाजपा) ५५ नागपूर मध्य-प्रवीण दटके (भाजपा) ५६ नागपूर पश्चिम-विकास ठाकरे (काँग्रेस) ५७ नागपूर उत्तर - नितीन राऊत (काँग्रेस) ५८ कामठी-चंद्रशेखर बावनकुळे (भाजपा) ५९ रामटेक-आशीष जैस्वाल (शिवसेना) ६० तुमसर-राजू कारेमोरे (राष्ट्रवादी काँग्रेस) ६१ भंडारा-नरेंद्र भोंडेकर (शिवसेना) ६२ साकोली-नानाभाऊ पटोले (काँग्रेस) ६३ अ. मोर-गाव- राजकुमार बडोले (राष्ट्रवादी काँग्रेस) ६४ तिरोरा-विजय रहांगडाले (भाजपा) ६५ गोंदिया-विनोद अग्रवाल (भाजपा) ६६ आमगाव-संजय पुरम (भाजपा) ६७ आरमोरी-रामदास मेश्राम (काँग्रेस) ६८ गडचिरोली-मिलिंद नरोटे (भाजपा) ६९ अहेरी-धर्मरावबाबा आत्राम (राष्ट्रवादी काँग्रेस) ७० राजुरा-देवराव भोंगले (भाजपा) ७१ चंद्रपूर-किशोर जोरगेवार (भाजपा) ७२ बल्लारपूर-सुधीर मुनगंटीवार (भाजपा) ७३ ब्रह्मपूरी-विजय वडेट्टीवार (काँग्रेस) ७४ चिमुर-बंटी भांगडिया (भाजपा) ७५ वरोरा-करण देवतळे (भाजपा) ७६ वणी-संजय दरेकर (शिवसेना - यूबीटी) ७७ राळेगाव-अशोक उइके (भाजपा) ७८ यवतमाळ-अनिल मंगूळकर (काँग्रेस) ७९ दिग्रस-संजय राठोड (शिवसेना) ८० आर्णी-राजू तोडसांब (भाजपा) ८१ पुसद-इंद्रनील नाईक (राष्ट्रवादी काँग्रेस) ८२ उमरखेड-किशन वानखेडे (भाजपा) ८३ किनवट-भीमराव केराम (भाजपा) ८४ हदगाव-संभाजी कोहळीकर (शिवसेना) ८५ भोकर-श्रीजया चव्हाण (भाजपा) ८६ नांदेड उत्तर-बालाजी कल्याणकर (शिवसेना) ८७ नांदेड दक्षिण - आनंद तिडके (शिवसेना) ८८ लोहा-प्रताप चिखलीकर (राष्ट्रवादी काँग्रेस) ८९ नायगाव-राजेश पवार (भाजपा) ९० देगलूर-जितेश अंतापूरकर (भाजपा) ९१ मुखेड-तुषार राठोड (भाजपा) ९२ बसमत-चंद्रकांत नवघरे (राष्ट्रवादी काँग्रेस) ९३ कळमनूरी-संतोष बांगर (शिवसेना) ९४ हिंगोली-तानाजी मुटकुळे (भाजपा) ९५ जिंतूर-मेघना बोर्डीकर (भाजपा) ९६ परभणी-राहुल पाटील (शिवसेना-यूबीटी) ९७ गंगाखेड-रत्नाकर गुट्टे (म हायुती) ९८ पाथरी-राजेश विटेकर (राष्ट्रवादी काँग्रेस) ९९ परतूर-बबन लोणीकर (भाजपा) १०० घनसावंगी-हिकमत उढाण (शिवसेना) १०१ जालना-अर्जुन खोतकर (शिवसेना) १०२ बदना-पूर-नारायण कुचे (भाजपा) १०३ भोकरदण-संतोष दानवे (भाजपा) १०४ सिल्लोड-अब्दुल सत्तार (शिवसेना) १०५ कन्नड-संजना जाधव (शिवसेना) १०६ फ ुलंब्री-अनुराधा चव्हाण (भाजपा) १०७ औरंगाबाद मध्य-प्रदीप जैस्वाल (शिवसेना) १०८ औरंगाबाद पश्चिम-संजय शिरसाट (शिवसेना) १०९ औरंगाबाद पूर्व-अतुल सावे (भाजपा) ११० पैठण-विलास भुमरे (शिवसेना) १११ गंगापूर-प्रशांत बंब (भाजपा) ११२ वैजापूर-रमेश बोरनारे (शिवसेना) ११३ नांदगाव-सुहास कांदे (शिवसेना) ११४ मालेगाव मध्य-मौलाना मुफ्ती मोहंमद इस्माईल (एमआयएम) ११५ मालेगाव बाह्य-दादाजी भुसे (शिवसेना) ११६ बागलाण-दिलीप बोरसे (भाजपा) ११७ कळवण-नितीन पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) ११८ चांदवड-राहुल आहेर (भाजपा) ११९ येवला-छगन भुजबळ (राष्ट्रवादी काँग्रेस) १२० सिन्नर-माणिकराव कोकाटे (राष्ट्रवादी काँग्रेस) १२१ निफाड-दिलीप बनकर (राष्ट्रवादी काँग्रेस) १२२ दिंडोरी-नरहरी झिरवळ (राष्ट्रवादी काँग्रेस) १२३ नाशिक पूर्व- राहुल ढिकाले (भाजपा) १२४ नाशिक मध्य-देवयानी फरांदे (भाजपा) १२५ नाशिक पश्चिम-सीमा हिरे (भाजपा) १२६ देवळाली-सरोज अहिरे (राष्ट्रवादी काँग्रेस) १२७ इगतपुरी-हिरामण खोसकर (राष्ट्रवादी काँग्रेस) १२८ डहाणू-विनोद निकोले (भारतीय कम्युनिस्ट पक्ष) १२९ विक्रमगड-हरिश्चंद्र भोये (भाजपा) १३० पालघर-राजेंद्र गावीत (शिवसेना) १३१ बोईसर-विलास तरे (शिवसेना) १३२ नालासोपारा- राजन नाईक (भाजपा) १३३ वसई-स्नेहा दुबे (भाजपा) १३४ भिवंडी ग्रामीण-शांताराम मोरे (शिवसेना) १३५ शहापूर-दौलत दरोडा (राष्ट्रवादी काँग्रेस) १३६ भिवंडी पश्चिम-म हेश चौघुले (भाजपा) १३७ भिवंडी पूर्व-रईस शेख (समाजवादी पक्ष) १३८ कल्याण पश्चिम-विश्वनाथ भोईर (शिवसेना) १३९ मुरबाड-किसन कथोरे (भाजपा) १४० अंबरनाथ बालाजी किणीकर (शिवसेना) १४१ उल्हासनगर कुमार आयलानी (भाजपा) १४२ कल्याण पूर्व सुलभा गायकवाड (भाजपा) १४३ डोंबिवली-रवींद्र चव्हाण (भाजपा) १४४ कल्याण ग्रामीण-राजेश मोरे (शिवसेना) १४५ मीरा भाईंदर - नरेंद्र मेहता (भाजपा) १४६ ओवळा माजीवाडा-प्रताप सरनाईक (शिवसेना) १४७ कोपरी पाचपाखडी-एकनाथ शिंदे (शिवसेना) १४८ ठाणे-संजय केळकर (भाजपा) १४९ मुंब्रा कळवा- जितेंद्र आव्हाड (राष्ट्रवादी - एसपी) १५० ऐरोली-गणेश नाईक (भाजपा) १५१ बेलापूर-मंदा म्हात्रे (भाजपा) १५२ बोरिवली-संजय उपाध्याय (भाजपा) १५३ दहिसर-मनीषा चौधरी (भाजपा) १५४ मागाठाणे-प्रकाश सुर्वे (शिवसेना) १५५ मुलुंड-मिहिर कोटेचा (भाजपा) १५६ विक्रोळी- सुनील राऊत (शिवसेना- यूबीटी) १५७ भांडुप पश्चिम-अशोक पाटील (शिवसेना) १५८ जोगेश्वरी पूर्व- अनंत (बाळा) नर (शिवसेना-यूबीटी) १५९ दिंडोशी- सुनील प्रभू (शिवसेना- यूबीटी) १६० कांदिवली पूर्व- अतुल भातखळकर (भाजपा) १६१ चारकोप- योगेश सागर (भाजपा) १६२ मालाड पश्चिम- अस्लम शेख (काँग्रेस) १६३ गोरेगाव- विद्या ठाकूर (भाजपा) १६४ वर्सोवा- हरून खान (शिवसेना-यूबीटी) १६५ अंधेरी पश्चिम- अमित साटम (भाजपा) १६६ अंधेरी पूर्व- मुरजी पटेल (शिवसेना) १६७ विर्ले पार्ले- पराग अळवणी (भाजपा) १६८ चांदिवली-दिलीप लांडे (शिवसेना) १६९ घाटकोपर प.-राम कदम (भाजपा) १७० घाटकोपर पूर्व- पराग शाह (भाजपा) १७१ मानख-ुर्द शिवाजी नगर- अबू आझमी (सम ाजवादी पक्ष) १७२ अणुशक्ती नगर- सना मलिक (राष्ट्रवादी काँग्रेस) १७३ चेंबूर-तुकाराम काते (शिवसेना) १७४ कुर्ला-मंगेश कुडाळकर (शिवसेना) १७५ कलिना- संजय पोतनीस (शिवसेना-यूबीटी) १७६ वांद्रे पूर्व- वरुण सरदेसाई (शिवसेना- यूबीटी) १७७ वांद्रे पश्चिम आशीष शेलार (भाजपा) १७८ धारावी-ज्योति गायकवाड (काँग्रेस) १७९ सायन कोळीवाडा- कॅप्टन तामीळ सेल्वन (भाजपा) १८० वडाळा- कालिदास कोळंबकर (भाजपा) १८१ माहीम- महेश सावंत (शिवसेना- यूबीटी) १८२ वरळी-आदित्य ठाकरे (शिवसेना- यूबीटी) १८३ शिवडी- अजय चौधरी (शिवसेना-यूबीटी) १८४ भायखळा- मनोज जाम सुतकर (शिवसेना- यूबीटी) १८५ मलबार हिल-मंगलप्रभात लोढा (भाजपा) १८६ मुंबादेवी- अमिन पटेल (काँग्रेस) १८७ कुलाबा- राहुल नार्वेकर (भाजपा) १८८ पनवेल- प्रशांत ठाकूर (भाजपा) १८९ कर्जत- महेंद्र थोरवे (शिवसेना) १९० उरण- महेश बालदी (भाजपा) १९१ पेण-रवींद्र पाटील (भाजपा) १९२ अलिबाग-महेंद्र दळवी (शिवसेना) १९३ श्रीवर्धन- अदिती तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस) १९४ महाड- भरत गोगावले (शिवसेना) १९५ जुन्नर- शरद सोनवणे (अपक्ष) १९६ आंबेगाव- दिलीप वळसे पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) १९७ खेड आळंदी- बाबाजी काळे (शिवसेना-यूबीटी) १९८ शिरूर- ज्ञानेश्वर कटके (राष्ट्रवादी काँग्रेस) १९९ दौंड- राहुल कुल (भाजपा) २०० इंदापूर- दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी काँग्रेस) २०१ बारामती-अजित पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) २०२ पुरंदर- विजय शिवतरे (शिवसेना) २०३ भोर- शंकर मांडेकर (राष्ट्रवादी काँग्रेस) २०४ मावळ- सुनील शेळके (राष्ट्रवादी काँग्रेस) २०५ चिंचवड- शंकर जगताप (भाजपा) २०६ पिंपरी- अण्णा बनसोडे (राष्ट्रवादी काँग्रेस) २०७ भोसरी- महेश लांडगे (भाजपा) २०८ वडगाव शेरी-बापूसाहेब पठारे (राष्ट्रवादी - एसपी) २०९ शिवाजी नगर- सिद्धार्थ शिरोळे (भाजपा) २१० कोथरूड- चंद्रकांत पाटील (भाजपा) २११ खडकवासला-भीमराव तापकिर (भाजपा) २१२ पर्वती-माधुरी मिसाळ (भाजपा) २१३ हडपसर-चेतन तुपे (राष्ट्रवादी काँग्रेस) २१४ पुणे कॅंटोनमेंट- सुनील कांबळे (भाजपा) २१५ कसबा पेठ- हेमंत रासने (भाजपा) २१६ अकोले- किरण लहामटे (राष्ट्रवादी काँग्रेस) २१७ संगमनेर- अमोल खताळ (शिवसेना) २१८ शिर्डी- राधाकृष्ण विखे पाटील (भाजपा) २१९ कोपरगाव-आशुतोष काळे (राष्ट्रवादी काँग्रेस) २२० श्रीरामपूर- हेमंत ओगळे (काँग्रेस) २२१ नेवासा- विठ्ठल लंघे (शिवसेना) २२२ शेवगाव- मोनिका राजळे (भाजपा) २२३ राहुरी- शिवाजी भानुदास कर्डिले (भाजपा) २२४ पारनेर- काशिनाथ दाते (राष्ट्रवादी काँग्रेस) २२५ अहमदनगर शहर- संग्राम जगताप (राष्ट्रवादी काँग्रेस) २२६ श्रीगोंदा- बबनराव पाचपुते, (भाजपा) २२७ कर्जत जामखेड- रोहित पवार (राष्ट्रवादी - एसपी) २२८ गेवराई-विजयसिंह पंडित (राष्ट्रवादी काँग्रेस) २२९ माजलगाव- प्रकाश सोळंके (राष्ट्रवादी काँग्रेस) २३० बीड- संदीप क्षीरसागर (राष्ट्रवादी - एसपी) २३१ आष्टी- सुरेश धस (भाजपा) २३२ केज- नमिता मुंदडा (भाजपा) २३३ परळी- धनंजय मुंडे (राष्ट्रवादी काँग्रेस) २३४ लातूर ग्रामीण-रमेश कराड (भाजपा) २३५ लातूर शहर-अमित देशमुख (काँग्रेस) २३६ अहम दपूर- बाबासाहेब पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) २३७ उदगीर- संजय बनसोडे (राष्ट्रवादी काँग्रेस) २३८ निलंगा- संभाजी पाटील निलंगेकर (भाजपा) २३९ औसा-अभिमन्यू पवार (भाजपा) २४० उमरगा-प्रवीण वीरभद्रय्या स्वामी (शिवसेना-यूबीटी) २४१ तुळजापूर- राणाजगजितसिंह पाटील (भाजपा) २४२ उस्मानाबाद कैलास पाटील (शिवसेना- यूबीटी) २४३ परांडा- तानाजी सावंत (शिवसेना) २४४ करमाळा- नारायण पाटील (राष्ट्रवादी - एसपी) २४५ माढा- अभिजीत पाटील (राष्ट्रवादी - एसपी) २४६ बार्शी- दिलीप सोपल (शिवसेना- यूबीटी) २४७ मोहा-ेळ- राजू खरे (राष्ट्रवादी - एसपी) २४८ सोलापूर शहर उत्तर- विजय देशमुख (भाजपा) २४९ सोलापूर शहर म.-देवेंद्र कोठे (भाजपा) २५० अक्कलकोट -सचिन कल्याणशेट्टी (भाजपा) २५१ सोलापूर दक्षिण- सुभाष देशमुख (भाजपा) २५२ पंढरपूर- औताडे समाधान महादेव (भाजपा) २५३ सांगोले- बाबासाहेब देशमुख (अपक्ष) २५४ माळशिरस-उत्तम जानकर (राष्ट्रवादी - एसपी) २५५ फलटण- सचिन पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) २५६ वाई- मकरंद जाधव(राष्ट्रवादी काँग्रेस) २५७ कोरेगाव-महेश शिंदे (शिवसेना) २५८ माण-जयकुमार गोरे (भाजपा) २५९ कराड उत्तर- मनोज घोरपडे (भाजपा) २६० कराड दक्षिण-अतुल भोसले (भाजपा) २६१ पाटण- शंभुराज देसाई (शिवसेना) २६२ सातारा- शिवेंद्रराजे भोसले (भाजपा) २६३ दापोली- योगेश कदम (शिवसेना) २६४ गुहागर- भास्कर जाधव (शिवसेना- यूबीटी) २६५ चिपळूण-शेखर निकम (राष्ट्रवादी काँग्रेस) २६६ रत्नागिरी- उदय सामंत (शिवसेना) २६७ राजापूर- किरण सामंत (शिवसेना) २६८ कणकवली- नीतेश राणे (भाजपा) २६९ कुडाळ- निलेश राणे (शिवसेना) २७० सावंतवाडी- दीपक केसरकर (शिवसेना) २७१ चंदगड- शिवाजी पाटील (अपक्ष) २७२ राधानगरी- प्रकाश आबिटकर (शिवसेना) २७३ कागल- हसन मुश्रीफ (राष्ट्रवादी काँग्रेस) २७४ कोल्हापूर दक्षिण- अमल महाडीक (भाजपा) २७५ करवीर- चंद्रदीप नरके (शिवसेना) २७६ कोल्हापूर उत्तर- राजेश क्षीरसागर (शिवसेना) २७७ शाहूवाडी- विनय कोरे (जनसुराज्य) २७८ हातकणंगले-अशोकराव माने (शिवसेना) २७९ इचलकरंजी- राहुल प्रकाश अवाडे (भाजपा) २८० शिरोळ- राजेंद्र पाटील (राजर्षी शाहू विकास आघाडी) २८१ मि रज- सुरेश खाडे (भाजपा) २८२ सांगली-सुधीर गाडगीळ (भाजपा) २८३ इस्लाम पूर- जयंत पाटील (राष्ट्रवादी - एसपी) २८४ शिराळा- सत्यजीत देशमुख (भाजपा) २८५ पलूस कडेगाव- विश्वजित कदम (काँग्रेस) २८६ खानापूर- सुहास बाबर (शिवसेना) २८७ तासगाव- रोहित पाटील (राष्ट्रवादी - एसपी) २८८ जत-गोपीचंद पडळकर (भाजपा)

**कार्यकर्त्यांचे आणि राज्यभरातील जनतेचे मानले आभार** — **केंद्रीयराज्यमंत्री रामदास आठवले**

# लाडक्या बहिणीच्या नारीशक्ती सोबत आंबेडकरी जनतेच्या भीमशक्तीमुळे महायुतीचा ऐतिहासिक महाविजय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनिधी : म हाराष्ट्रात महायुती चा महाविजय झाला आहे. राज्यात लाडक्या बहिणीची नारी शक्ती ; सर्व सम ाज घटकांचा कौल महायुतीला मिळाला त्यासोबत दलित बौद्ध आंबेडकरी जनतेने महायुतीला भरघोस मतदान केल्या मुळे महायुती चा ऐतिहासिक विजय झाला आहे. नरेंद्र मोदींनी केलेला आहे देशाचा विकास; त्यामुळे दिसत आहे महायुतीच्या विजयाचा विकास; आज आम्हाला दिसत आहे निळ निळ आकाश ; म हाविकास आघाडी झाली आहे भकास अशी चारोळी सादर करीत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या झालेल्या ऐतिहासिक विजयाचे स्वागत केले आहे .महायुती च्या सराव घटका पक्षाच्या कार्यकर्त्यांचे आणि रिपब्लिकन कार्यकर्त्यांच्या मेहनतीला यश आल्यानेच महायुतीला अभूतपूर्व यश लाभल्या बद्दल ना.रामदास आठवले यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आणि राज्यभरातील जनतेचे आभार मानले आहेत.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने संविधान बदलणार असा खोटा प्रचार केला. त्यामूळे जनतेच्या डोळ्यात खोट्या प्रचाराची धूळफेक करणाऱ्या महाविकास आघाडीला जनतेने पराभवाची धूळ चारली आहे .लाडकी बहिण योजनेला विरोध करणाऱ्या महाविकास आघाडीला महिलांनी चांगलाच धडा शिकवून म हायुतीला ऐतिहासिक विजयाची भाऊबीज भेट दिली आहे असे सांगत ना.रामदास आठवले यांनी महाराष्ट्राच्या जनतेचे आभार म ानले आहेत.

बांद्रा येथील जनसंपर्क कार्यालयाबाहेर रिपब्लिकन पक्षाक्या वतीने महायुती चा महविजय ढोल वाजवून फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला यावेळी ना.रामदास आठवले यांनीही ढोल वाजवून महायुती चा विजय साजरा केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन पुष्प-गुच्छ देऊन ना.रामदास आठवले यांनी महायुती च्या तिन्ही नेत्यांचे अभिनंदन केले.

१०वर्षामध्ये १० लाख कोटी पेक्षा जास्त पैसे म हाराष्ट्राच्या विकासासाठि केंद्राकडून मिळाले आहेत. नरेंद्र मोदीजींनी गरिब,युवा,म हिला,दलित,आदिवासी आणि ओबीसी या सर्वासाठी काम केलेले आहे.या महाराष्ट्रातील जनतेले भरभरुन आम्हाला पाठिंबा दिलेला आहे.एकतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी चुकीच्या पध्दतीने माननीय नरेंद्र मोदीजींना बदनाम करण्याचा प्रयत्न केला होता.एकनाथ शिंदे यांना गद्दार म्हणुन टोमणे मारण्यात आले होते आणि त्यांचा परिणाम म्हणुन संजय राऊत सारखे जे नेते होते त्यांनी सातत्याने चुकीच्या पध्दतीने बोलत हाते.त्यामुळे लोकांनी ठरविले की महाविकास आघाडीला धडा शिकवण अत्यंत आवश्यक आहे.त्यामुळे म हाविकास आघाडीला एक मोठा धडा शिकवण्यात आला आहे. म हायुतीला प्रचंड बहुमताने विजयी केलेल आहे.आम्हाला अपेक्षा होती १७० जांगा मिळतील पण त्यापेक्षा जास्त ६० जागा जास्त मिळाल्या आहेत. महायुतीच सरकार एक-दोन दिवसा मध्ये स्थापन होईल.संजय राऊत आणि महाविकास आघाडिच्या नेत्यांना दुसरा काही धंदा नाही आहे.त्यामुळे त्यांना फक्त आरोप करण्याचाचा धंदा आहे .त्यामुळे ईथला मतदार राहिला नाही अंधा आणि महाविकास आघाडीचा हाच आहे धंदा त्यामुळे त्यांचा हाच धंदा असल्यामुळे लोकांनी त्यांना शिकवल आहे राजकारणा मध्ये कसे बोलले पाहिजे. अशा पध्दतीच उलट-सुलट बोलुन तुम्हाला मत पडणार नाही हे लोकांनी त्यांना दाखवून दिल आहे. संजय राऊत म्हण-तात त्यांना हा निर्णय मान्य नाही. तुमच्या एवढ्या जागा निवडुन आल्या लोकसभेमध्ये तुमच्या २१जागा निवडूण आल्या आमच्या१७ जागा मशीन मध्ये काहीतरी गडबडी खराबी केली आहे. लोकशाही मध्ये पराभव स्विकारण हिच खरी लोकशाही आहे.संजय राऊत यांना लोकशाही मान्य नसेल,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा संविधान मान्य नसेल तर संजय राऊत यांना या देशात राहण्याचा अधिकारच नाही.संजय राऊत चांगले माझे मित्र आहेत ते सामना चे संपादक आहेत, अत्यंत चांगले लेखक आहेत.अशा माणसाने आता निकाल आल्या नंतर ही जर त्यांना ते मान्यं नाही आहे म्हटल्यावर ते अयोग्य आहे. अशा पध्दतीच्या त्यांचा व्यक्तव्यामुळेच त्यांच मोठ नुकसान झाल आहे असे ना.राम दास आठवले म्हणाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### पैसे देण्यास नकार दिल्याने मारहाण, गुन्हा दाखल

सोलापूर, (प्रतिनिधी) : घेतलेले पैसे देण्यास नकार दिल्याने हात पिरघळून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २२ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास शिरालिंग नगर जुना विडी घरकुल येथे घडली.

या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी प्रभाकर शंकर निली (वय-४९,रा. शिरालिंग नगर,जुना विडी घरकुल,सोलापूर) व अमित क्षीरसागर (रा.सोना चांदी अपार्टमेंट,सोलापूर) या दोघांची ओळख असून,निली यानी क्षीरसागर यांच्याकडून पैसे घेतले होते.या पैशाची मागणी करता क्षीरस-ागर हा निलीच्या घराकडे गेला.त्यावेळी त्यांनी पैशाची मागणी केली असता,निली याने पैसे देण्यास नकार दिल्याने क्षीरसागर यांनी घरात प्रवेश करत फिर्यादीस त्याचा हात पिरघळून मारहाण केली.एमआयडीसी पोलीस ठाण्यात क्षीरसागर याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पो-लीस हवालदार नवले हे करीत आहेत.

### हँडल लॉक केलेली मोटरसायकल पळविली

सोलापूर (प्रतिनिधी) बोळकोटे नगरात हँडलॉक करून ठेवण्यात आलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली.राहुल श्रीनिवास म्याकम (रा.दत्तनगर सोलापूर) याने २२ नोव्हेंबर रोजी बोळकोटे नगरात आपली स्वतःची मोटरसायकल क्रम ांक एम.एच.१४.ई.एच.३३४५ हँडल लॉक करून ठेवली होती.अज्ञात चोरट्याने त्यावर नजर ठेवून ती चोरून नेली.एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

### स्वतःहून चाकूने वार करून जखमी, गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) राहत्या घरात अज्ञात कारणाने स्वतःच्या मानेवर चाकूने वार करून जखमी झाल्याने एकास उपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.तौसीब अब्दुल रशीद शेख (वय-४१,रा.बारा इमाम चौक,सोलापूर) याने रविवारी सकाळी ७ वाजता सुमारास राहत्या घरी अज्ञात कारणाने भाजी कट करण्याच्या चाकूने मानेच्या मागील बाजूस स्वतःहून खूपसून घेतले. जखमी झाल्याने उपचाराकरता मामा जुनेद याने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. रुग्ण शुद्धीवर आहे.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# आ.समाधान आवताडे यांचा दणदणीत विजय

## पंढरपूर मंगळवेढा परिसरात जल्लोष, गुलालाची उधळण करून आनंदोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. समाधान आवताडे यांची आमदार पदी भरघोस मताने निवड झाली जन-तेचे पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास ठेवून यांचे आमदार पदी निवड केली.

२५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून आ. समाधान आ-वताडे यांनी ८७१३ मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला यामध्ये किंग मेकर श्री प्रशांत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याची चेअरमन व पांडुरंग परिवाराचे प्रमुख. पांडुरंग परिवार चे कार्यकर्ते व शेतकरी सभासद यांचे त्यांना बळ मिळाल्यामुळे त्यांना मोठं मताधिक्य मिळाले.

आमदार समाधान आवता-डे हे निवडून आल्यानंतर पंढरपूर मंगळवेढा परिसरातील कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणे जल्लोष करून गुल-ालाची उधळण करून आनंद उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला.

आमदार समाधान आवताडे यांनी विकास कामे केली आहेत व विकास कामे खेचून आणण्याचा त्यांनी प्रयत्न देखील केला आहे व त्यांनी पंढरपूर मंगळवेढा म तदारसंघांमध्ये विकास कामाला गती देण्याचे काम ही त्यांनी केलेली आहे पंढरपूर मंगळवेढा मध्ये तीन हजार कोटी रुपयांचे कामे त्यांनी आपल्या पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांमध्ये आणून सर्वसामान्य जनतेच्या म ूलभूत सुविधा सुख सुविधा त्याचप्रम ाणे दोन्ही तालुक्यातील विकास कामाचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे व त्यांच्या या प्रयत्नामुळे त्यांनी २०२४ ची विधानसभेची निवडणूक ही चांगल्या मताधिक्याने ८७१३ मताधिक्य मिळवून त्यांनी आपली विजयी परंपरा कायम राखलेली आहे.

आमदार समाधान आवताडे यांनी सर्वसामान्य जनतेचे व जन-तेला दिलेले आश्वासन ते म्हणजे जास्तीत जास्त हजार कोटीचा निधी आणून त्यांनी पंढरपूर मंगळवेढा तालुक्यात विकास कामे करण्याचा त्यांनी निश्चय व्यक्त केला होता. ते पूर्ण करतील अशा सर्वसामान्य जनतेला व नागरिकांना वाटत असल्यामुळे.



आमदार समाधान आवताडे यांचा विजयाचा जल्लोष पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील व प्रत्येक गावांमध्ये व मतदारांनी गुलालाची उधळण करून आनंद उत्सव साजरा केला आहे.

## शहापूरला मंत्री पद मिळण्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी ठाणे ग्रामीणच्या वतीने जोरदार फिल्डिंग...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/प्रतिनिधी : शहापूर विधानसभा निवडणूक मध्ये निवडून आलेले महायुती चे उमेदवार दौलत दरोडा यांना मंत्री पदी नेमणुकीसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राष्ट्रवादी कॉँग्रेस ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष यांच्या वतीने पत्र देण्यात आलं आहे.

अजितदादा यांच्या शासकीय निवास स्थानी देवगिरी येथे ही भेट घेण्यात आली. यावेळी शहापूर कार्यकारिणी चे विविध पदाधिकारी उपस्थित होते. याच वेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस सोशल मीडिया सेल चे प्रमुख प्रफुल्ल शेवाळे कार्यकारिणी मध्ये सामील होते.राष्ट्रवादी कॉँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव राष्ट्रवादी कॉँग्रेस ठाणे ग्रामीण अध्यक्ष भरत गोंधळे, प्रदेश चिटणीस डी. के. विशे सर, प्रदेश सरचिटणीस किसनराव तारमळे, शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. मनोहर सासे आणि विविध पदाधिकारी उपस्थित होते.





# मोहोळ विधानसभा मतदारसंघातून राजू खरे यांचा प्रचंड मताने विजय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मो-होळ विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजू खरे. वर्षानुवर्षी मो-होळ मतदार संघातील असलेल्या एक अधिकार शाहीला मोहोळ विधानसभा मतदारसंघातील जनतेने मोडून काढत राजू खरे यांना मतदार संघाचे भरघोस मतांनी विजयी केले व राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार यशवंत माने यांचा तब्बल सुमारे ३० हजार म तांनी पराभव करून राजू खरे यांनी शरद पवार यांची तुतारी वाजवली व त्यांचा विजय हा सर्वसामान्य जनतेच्या मतदान रुपी आशीर्वाद



मिळाली लेणी नवनिर्वाद विजयी कौल मिळाला.

यावेळी कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष केला व यशवंत माने आणि राजन पाटील यांच्या एखादंशाहीला विरोधात एक लढा असल्याचे चित्र राजू खरे यांनी सुरुवातीलाच दाखवून मोहोळ तालुक्यातील सर्व विरोधी यशवंत माने आणि राजन पाटील यांच्या विरोधातील सर्व एकत्र करून त्यांची मदत घेऊन यामध्ये श्री उमेश दादा पाटील, श्री मनोहर डोंगरे, विजय डोंगरे, व संजय क्षीरसागर, म ोहोळ मतदार संघातील विरोधी सर्व एकत्र करून त्यांना त्यांच्यापासून मोठे पाठबळ मिळाल्यामुळे त्यांचा विजय हा निश्चित झाला आहे.

पासून उभे केले होते एक हाती असणारी सत्ता संपुष्टात आणून ते राजू खरे यांनी खरे करून दाखव-ले व दुरंगी लढतीत महाविकास आघाडीचे उमेदवार राजीव खरे यांनी ३० हजार २०२ मतांनी विद्यमान आमदार यशवंत माने यांचा पराभूत करून दणदणीत विजय मिळवला आहे.

महाविकास आघाडीचे नेत्यांची झालेली ही एकी मोहोळ मतदार संघातील सर्व जनता एक उठली त्यामुळे या विजयाचे सर्व श्रेय मो-होळ तालुक्यातील पीडित जनतेचे आहे आज खऱ्या अर्थाने मोहोळ तालुक्याच्या स्वातंत्र्याची पहाट उगवले आहे मागील ३० ते ४० वर्षापासूनचा रखडलेला विकासाला उद्यापासून प्रारंभ होईल राजू ज्ञानू खरे विजय उमेदवार विधानसभा मतदारसंघात परिवर्तन शिल्पकार ठरले असा विश्वास त्यांनी यावेळी जनतेतून व्यक्त केला आहे.

### आमदार देवेंद्र कोठे यांनी घेतले स्वामी समर्थांचे दर्शन

# सोलापूर शहर मध्य मधून प्रचंड बहुमताने निवडून आल्याबद्दल आमदार देवेंद्र कोठे स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : नुकतेच संपन्न झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार आमदार देवेंद्र कोठे यांनी प्रचंड बहुमताने निवडून आल्यानंतर सर्वप्रथम येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन स्वामी समर्थांचे दर्शन घेतले व स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक झाले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी आमदार देवेंद्र कोठे यांचा प्रचंड बहुमताने निवडून आल्याबद्दल स्वामी समर्थांचे

कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बोलताना आमदार देवेंद्र कोठे यांनी स्वामी समर्थांच्या कृपेने व मतदारसंघातील जनतेचे आपल्यावरील निष्ठेमुळे मतदार संघातील नागरिकांनी आपल्याला लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभेत पाठविले आहे. याबद्दल मी मतदार संघातील नागरिकांचा व स्वामी समर्थांचा अत्यंत ऋणी आहे. या भाव-नेतून मतदारसंघातील नागरिकांना भेट देत ऋण व्यक्त करण्यासाठी आज स्वामी समर्थ चरणी नतमस्तक होण्यासाठी येथे येऊन स्वामी चरणी नतमस्तक झालो असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी मंदिर समितीचे प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे आदींसह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.




### एक लाख १६ हजार २५६ मते मिळवित २५ हजार २८६ मताधिक्याने विजयी

कार्यकर्त्यांचा जल्लोष

# सांगोला विधानसभा मतदारसंघात डॉ. बाबासाहेब देशमुख यांचा ऐतिहासिक विजय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा मतदारसंघातून म हाविकास आघाडीचे मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या एक लाख १६ हजार २५६ मताधिक्याने विजयी झाला आहे व २५३ सांगोला विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत विद्यमान आमदार शहाजी बापू पाटील माजी आम दार दीपक साळुंखे पाटील यांचा पराभव करत एक लाख १६ हजार २५६ मते मिळवित २५ हजार २८६ मताधिक्याने शेतकरी कामगार पक्षाची डॉक्टर बाबासाहेब देशमुख प्रचंड मतांनी विजयी झाले आहेत.

एकूण मतदान दोन लाख ६६ हजार मतदान झाले आहे असे एकूण दोन लाख ६३ हजार ६१९ इतकी मतदान झाले आहे. या मतदानापैकी महायुतीचे उमेदवार शिवाजी बापू पाटील यांना ५०००० ८७० व म हायुगास आघाडी उमेदवार दीपक साळुंखे पाटील यांना ५००००९६२ शाखा चे डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना एक लाख १६ हजार २५६ इतकी मते मिळाले आहेत एक हजार १०६ मते मिळाले आ-हेत मतमोजणी सुरू असताना प्रत्येक फेरी डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी आघाडी घेतली व पाचवे फ ेरी पूर्ण होतात बाबासाहेब देशमुख यांनी आघाडी घेतली व पाचवी फेरी पूर्ण होतात शाखापच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करण्यास सुरुवात केली आणि तालुक्याच्या आमदार पदाची माळ डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या गळ्यात पडले आहे.

सांगोला विधानसभा म तदारसंघाची निवडणूक ही अटीतटीची व चुरशीची व आव्ह-ानात्मक होती. या निवडणुकीत शाखा चे डॉक्टर बाबासाहेब देशमुख महायुतीचे उमेदवार शहाजी बापू पाटील माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील अशी तिरंगी लढत पाहावयास मिळाली व सांगोला विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान जे विरोधी जोडी कायम राहिला असे सांगितले जात होते परंतु त्यांच्यामध्ये पोट पडली शिवसेना शिंदे गटातून आमदार साईबाबा पाटील तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून माजी आमदार दीपक कबाब साळुंखे पाटील यांनी निवडणूक लढवली. तसेच शेतकरी कामगार पक्षाचे प्रथम दोन गट पडली होती परंतु डॉक्टर बाबासाहेब देशमुख डॉक्टर अनिकेत देशमुख यांनी एकत्रित येऊन एक रुपयांनी निवडणूक लढण्यास निर्णय घेतला त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाला या निवडणुकीमध्ये मोठे यश संपादन करता आले.

## थोडक्यात...

### आम्रपाली चौकात तरुणाने घेतला गळफास

सोलापूर (प्रतिनिधी) राहत्या घराच्या स्लॅबच्या लोखंडी हुकाला नायलॉनच्या दोरीने स्वतः गळफास घेऊन एकाने आत्म हत्या केली.

श्रीकांत सुरेश भगत (वय-३५,रा. आंबेडकर नगर,आम्रपाली चौक सोलापूर) असे त्या मयत युवकाचे नाव आहे. शनिवारी रात्री ७ च्या सुमारास त्याने स्वतःच्या घरात हे कृत्य केले.नातेवाईकांनी त्यास खाली उतरवून बेशुद्ध अवस्थेत उपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते.परंतु उपचारा पूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची डॉक्टरांनी सांगितले.या घटनेची नोंद जोडभावी पोलीस ठाण्यात झाली आहे.

### गवत काढताना मशीनचा स्फोट होऊन एक जण जखमी

सोलापूर (प्रतिनिधी) स्वतःच्या शेतात मशीनद्वारे गवत काढत असताना अचानकपणे मशीनचा स्फोट झाल्याने एक जण जखमी झाला .

या घटनेच्या हकीकत अशी की,सयाजी विलास गायकवाड (वय-४०-,रा.माढा) हा रविवारी सकाळी ८ च्या सुमारास स्वतःच्या शेतात मशीनद्वारे गवत काढत असताना मशीनचा अचानक स्फोट झाला.दोन्ही मांडीस,पोटास,हातास तोंडास भाजल्याने उपचाराकरता पत्नीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# आ. दत्तात्रय भरणे यांच्याकडून हर्षवर्धन पाटलांचा पराभव

## इंदापुरात दत्तात्रय भरणेंनी मारली हॅट्रिक, कार्यकर्त्यांकडून गुलालाची उधळण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर/प्रतिनिधी, अतुल सोनकांबळे : महाराष्ट्रातील २८८ जागांसाठी मतमोजणी पुर्ण झाली. कुणाचं सरकार राज्यात येणार? याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. पुणे जिल्ह्यातील लक्षवेधी लढतींमध्ये इंदापूरचा नंबर पहिला लागतो. दोन माजी मंत्र्यांमध्ये झालेल्या या लढतीकडे सर्वांचं लक्ष लागलेलं होतं. अजित पवार गटाकडून माजी मंत्री दत्तात्रय भरणे यांना उमेदवारी देण्यात आली.



तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. तर शरद पवार गटाकडून उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेले प्रविण माने अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात होते. यामुळे इंदापूरच्या तिरंगी लढती कडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते.

इंदापूर विधानसभेची निवडणूक अतिशय चुरशीची झाली असून या निवडणुकीमध्ये दत्तात्रय भरणे, हर्षवर्धन पाटील, प्रवीण माने यांच्यामध्ये मोठ्या चुरशीची लढत पाहायला मिळाली. शनिवार (दि.२३) रोजी विधानसभेच्या निवडणुक निकालाचे सर्व आकडे स्पष्ट झाले आहे.

यामध्ये इंदापूर मधील २६ पैकी २६ फेरींची मत मोजणी पूर्ण झाली असून यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे उमेदवार दत्तात्रय भरणे यांचा १९ हजार ४१० मतांनी विजयी झाला आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

**पडलेली मते. –** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे उमेदवार दत्तात्रय भरणे यांना एकूण १ लाख १७ हजार २३६.

– राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांना ९७ हजार ८२६.

– इंदापूर परिवर्तन विकास आघाडीचे अपक्ष उमेदवार प्रवीण माने यांना ३७ हजार ९१७. मते पडली आहेत.



### इंदापूरची राजकीय समीकरणं बदलली

**२०१९ च्या निवडणुकीवेळी राज्यातील समीकरणं बदलली. काँग्रेस आणि राष्ट्रवादीतील अनेकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यात हर्षवर्धन पाटील यांचाही समावेश होता. पाटील यांनी काँग्रेसला रामराम करत भाजपमध्ये प्रवेश केला. आता २०२४ मध्ये पुन्हा एकदा इंदापूरमधील राजकीय परिस्थिती बदलली. अजित पवार समर्थक भाजपसोबत गेले. तेव्हा इंदापूरचे विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे हे देखील महायुतीत सामील झाले.**

### पाटलांना तिकीट, प्रवीण माने नाराज

**जागा वाटपात इंदापूरची जागा राष्ट्रवादी अजित पवार गटाला गेली. यातच शरद पवार आणि हर्षवर्धन पाटील यांचा संपर्क झाला. महाविकास आघाडीकडून तिकीट फायनल होताच हर्षवर्धन पाटलांनी शरद पवारांच्या हातात हात दिला. हर्षवर्धन पाटील यांचं तिकीट फायनल झालं खरं पण यामुळे संघर्षाच्या काळात शरद पवारांसोबत राहिलेले सोनाई दूध संघाचे संचालक प्रविण माने हे नाराज झाले. त्यांनी अपक्ष निवडणूक लढण्याची घोषणा केली. त्यामुळे यंदा इंदापूरमध्ये तिरंगी लढत झाली.**

# भारताच्या मिसिंग मिडलवर विशेष लक्ष केंद्रित करणारी संपूर्ण आरोग्य विमा योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर(प्रतिनिधी)मणिपालसिग्ना हेल्थ इन्शुरन्स, सर्वात वेगाने वाढणारी स्टँडअलोन आरोग्य विमा कंपनी आहे. कंपनीने 'मणिपालसिग्ना सर्व' या नवीन आरोग्य विमा योजनेची घोषणा केली. संपूर्ण आरोग्य विमा उपाय ऑफर करण्यासाठी डिझाइन केलेली, 'सर्व' – ज्याचा अर्थ सर्वांसाठी आहे, भारताच्या मिसिंग मिडल लोकसंख्येवर विशेष लक्ष केंद्रित करून, व्यापक ग्राहक वर्गांसाठी परवडणारे आणि सर्वसमावेशक आरोग्य कव्हरेज प्रदान करते.संसर्गजन्य, असंसर्गजन्य आणि जीवनशैलीतील आजारांच्या तिहेरी आजाराशी भारत लढत आहे. नीति आयोगाच्या 'हेल्थ इन्शुरन्स फॉर इंडियाज मिसिंग मिडल' अहवालानुसार, लोकसंख्येच्या किमान ३०% किंवा 'द मिसिंग मिडल' या विभागात येणाऱ्या ३५-४० कोटी व्यक्ती आरोग्यासाठी कोणत्याही आर्थिक संरक्षणापासून वंचित आहेत.मणिपालसिग्ना हेल्थ इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ प्रसून सिकदार यांनी या लाँचवर टिप्पणी करताना सांगितले की, मणिपालसिग्नामध्ये आमची वचनबद्धता केवळ आरोग्य विमा ऑफर करणे ही नाही, तर नवनवीन उपाय शोधून भारतातील मिसिंग मिडलसह परवडणारी आरोग्यसेवा सर्वांपर्यंत पोहोचविणे आणि त्यातील अंतर भरून काढणे ही आमची वचनबद्धता आहे. 'मणिपालसिग्ना सर्व' लाँच करून, आम्ही एक संपूर्ण आरोग्य विमा उपाय सादर करत आहोत, जे केवळ विविध ग्राहक वर्गांनाच पुरवत नाही, तर भारताच्या मिसिंग मध्यमवर्गाला भेडसावणाऱ्या परवडण्याजोगे आणि सुलभतेच्या आव्हानांना धोरणात्मकरीत्या संबोधित करते, तसेच २०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा या सरकार आणि नियामकांच्या दृष्टिकोनाला चालना देते.

सिकदार पुढे म्हणाले, प्रत्येक योजना 'द मणिपालसिग्ना सर्व ट्रिनिटी' कव्हरेजची योग्य पातळी प्रदान करण्यासाठी आणि सर्वांसाठी आवश्यक शिल्ड, अनंत शक्ती आणि त्वरित शांतता प्रदान करण्यासाठी अनुकूल लाभांसह डिझाइन केले गेले आहे. आम्हाला विश्वास आहे की, 'मणिपालसिग्ना सर्व' अनंत लाभ ऑफर करते. यात ४ प्रमुख अवयवांच्या आजारांसाठी अमर्यादित कव्हर दिले जाते. गुलक बेनिफिट दाव्यांची पर्वा न करता १०००% विम्याच्या रकमेची हमी देते. सारथी लाभ ३१ व्या दिवसापासून मधुमेह, लठ्ठपणा, दमा, रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल यांसारख्या पूर्व-अस्तित्वातील आजारांसाठी कव्हर देते. इतर मोहक वैशिष्ट्यांसह लोकांना त्यांच्या विशिष्ट आरोग्यविषयक गरजांसाठी योग्य स्तरावरील कव्हरेज सुरक्षित करण्यात मदत करण्यात यामुळे अर्थपूर्ण फरक पडेल.

# राणाजगजितसिंह पाटील यांच्या विजयाने वागदरीत जल्लोष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : नुकतेच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे भाजपचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील उर्फ राणा दादा हे आपले प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार कुलदीप उर्फ धिरज आप्पासाहेब पाटील यांचा पराभव करून प्रचंड बहुमताने विजयी झाले आहेत.त्यांच्या विजयाने महायुतीच्या कार्यकर्त्यांनी तुळजापूर नळदुर्ग वागदरी सह सर्वत्र जल्लोष करून आनंदोत्सव साजरा केला.



नुकतंच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टी, शिवसेना (एकनाथ शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार म्हणून भाजपचे राणाजगजितसिंह पाटील यांनी निवडणूक लढविली होती त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार कुलदीप उर्फ धिरज भैय्या पाटील यांनी निवडणूक लढविली होती.दोघामध्ये अत्यंत चुरशीची लढत होऊन महायुतीचे भाजपचे राणाजगजितसिंह पाटील उर्फ राणा दादा हे प्रचंड बहुमताने विजयी झाले आहेत.

त्यांच्या विजयामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी तुळजापूर, नळदुर्ग, वागदरी सह सर्वत्र जल्लोष करून आनंदोत्सव साजरा केला आहे.

वागदरी येथे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या विजयामुळे गावातून भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत भाजपचे वागदरी बुथ प्रमुख मदन पाटील, तालुका उपाध्यक्ष किशोर सुरवसे, भाजपा मेडीया सेल तालुका उपाध्यक्ष किशोर धुमाळ,बाळू पवार, रामसिंग परिहार, दत्ता सुरवसे, जितेंद्र पाटील, भालचंद्र यादव, कल्याण मिटकर,हाणमंत परिहार, रिपाइं (आठवले) एस.केगायकवाड, अनिल वाघमारे, संतोष झेंडारे,सह महायुतील सर्व घटक पक्षांचे कार्यकर्ते, युवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटु येथील श्रीशैल्य महादेव मंदिर सभागृहात या विजयी मिरवणूकीची सांगता करण्यात आली.

# माढा मतदारसंघाचा ३० वर्षाचा कारभारी तीस हजार मतांनी मक्तेदारी संपुष्टात आणली : अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघातून २०२४ च्या निवडणुकीमध्ये विविध आबा पाटील यांनी ३०२०४ आताचे आघाडी घेऊन विजय प्राप्त केला.

माढा मतदारसंघातील तीस वर्षापासून असलेली आज संपुष्टात आली आहे. बबन दादा शिंदे यांनी विकास काम केलेली त्यांना नीट समजावून सांगता आली नाही. माढा मतदारसंघांमध्ये त्यांनी जनसंपर्क ठेवायचा होता तो ठेवला नाही न ठेवल्याचे दिसून येत आहे.

माढा मतदारसंघातून मेद विकास कामे त्याचप्रमाणे प्रचार यंत्रणा राबवण्यात देखील कमी पडले दिसून आले आहे आम्ही तेव्हा पाटील यांनी उसाचा दर जाहीर करून आणि काटा हा शेतकऱ्यांनी कुठेही करून असे त्यांनी सांगून ते आपण बिल देणे देईल असे जाहीर करण्यात हवीत पाटील हे या माळावे विधानसभेला निवडून येणारे संकेत त्या देवळी मिळत होते संपूर्ण कायापालट करण्याचे अगोदर पाटील यांनी केलेली घोषणा तसेच याला सर्वसामान्य जनतेने दिलेला मतदान रुपी भरभरून दूर आहेच निवडणुकीतील निकालांमधून दिसून येते.



पाटील म्हणाले शेतकऱ्यांच्या पोराला पाण्यातील जनतेने आमदार केलं सर्वांचा मनापासून अभिनंदन आभार हा विजय एकट्याचा नाही तर तमाम माढा मतदारसंघातील मायबाप जनतेचा व सहकार्यांचा महाविकास आघाडीतील सर्व नेते मंडळींचा विजय आहे.

पाटील हे माढा मतदार संघाच्या विकास करतील ही अपेक्षा वाळवून मतदान केले व त्यांना विजयी केली. अभ्यासू व विकसनशील असलेल्या अभिताबा पाटील यांना माढा व पंढरपूर मतदार संघात त्यांचे गुलालाची जेसीबीने उधळण करून मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आलेले आहे.

**लाडक्या बहिणीनी दिल्या भावाला अंतःकरणाने अशिर्वाद**

**नळदुर्ग शहरात फटाक्याची अतिषबाजी करत आनंद उत्सव करण्यात आला साजरा**

# आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची तुळजापुरात ढोल ताशाच्या गजरात विजयी जल्लोष मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महाराष्ट्र राज्यात महायुती ऐतिहासिक विजय झाला असून यामध्ये हा विजय खरं तर लाडक्या बहिणीचा लाडक्या भावाला भरघोस मत दान देऊन भरभरून आशीर्वाद दिला आहे . त्यामुळे महाराष्ट्र राज्यात परत महायुती सरकारला मोठ यश मिळाले आहे .

तुळजापूर तालुक्यात तुळजापूरचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रामाणिक पणा मुळे व लोकांशी असलेला संवाद प्रेम मोह माया आणि तालुक्याचा विकास तालुक्या सह धाराशिव जिल्हयाच्या सर्वांगिण विकासा साठी गेली अनेक वर्ष सातत्याने प्रामाणिक प्रयत्न केला ही बाजू भक्कम ठेऊन त्याच बरोबर आपुलकी ही भावना उराशी वाळवून





लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या अथक प्रयत्नाने आणि त्यांनी केलेल्या कामाचा लौकिक पणा समोर आल्यामुळे राणा पाटील हे ३६८७९ मताधिक्याने विजयी झाले आहेत विकास कामामध्ये महापुरुषाचे स्मारके , महत्वाचा पाणी प्रश्न , जलकुंभ, पाईप लाईन , मंदीर जीर्णोद्धार , रोजगार आसो तुळजापूर तालुक्यासह धाराशिव जिल्ह्याचा वैभवशाली समृद्ध वारसा जोपासण्यासाठी ऐतिहासिक वाटचाल सुरू आसुन त्यांच्या विजया मुळे नळदुर्ग सह तुळजापूर व तुळजापूर मतदार संघां मध्ये विजयी उत्सव साजरा करण्यात येत आहे . याच बरोबर लाडकी बहीण योजना ही योजना भावासाठी सफल ठरली आसुन बहिणीने भावाला भरभरून आशीर्वाद दिला आहे त्यामुळे तुळजापूरची लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील हे मताधिक्याने विजयी झाल्यामुळे बहिणी सह भावाने सुद्धा गुलालाची उधळण करत पेढे वाटून आनंद उत्सव साजरा करण्यात आला .यावेळी युवा नेते सुनील चव्हाण जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील , माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष बोबडे , जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवदास गुरुजी कांबळे ,जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अस्मिताताई कांबळे , नळदुर्ग शहरातील भाजपाचे नेते सुशांत भूमकर भाजपाचे नेते तथा माजी नगरसेवक सुधीर हजारे गणेश सोनटक्के , अरुण लोखंडे , भाजपाचे संजय जाधव पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे पत्रकार उत्तम बनजगोळे पत्रकार मित्र अमर भाळे पत्रकार शिवाजी नाईक विशाल डुकरे श्रमिक पोद्दार धिमाजी घुगे , बंडू पदाले सागर हजारे पांडु पुदाले ,रिपाईचे बाबासाहेब बनसोडे नळदुर्ग शहर अध्यक्ष मारुती खारवे सह हजारोंच्या संख्येने नागरीक उपस्थित होते निकाल जाहीर होताच तुळजापूरचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची जीप मधून भव्य आशी विजयी जल्लोष मिरवणूक काढण्यात आली या मध्ये ढोल ताशा हलग्यांचा कडकडाट शोभची दारू गुलालाची व गुलाबाच्या फुलाची उधळण करत खूप मोठ्या प्रमाणात मिरवणूक काढण्यात आली हि मिरवणूक तुळजाभवानी इंजिनिअरिंग कॉलेज ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला पुष्पहार आर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले यानंतर महाराषट्राचे अराध्य दैवत आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी मंदिरात प्रवेश केला दर्शन घेऊन

मिरवणुकीचा समारोप करण्यात आला यावेळी तुळजापूर मतदार संघातील हाजारोच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते .